# महिलांच्या एकात्मिक विकासासाठी सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेले कार्य

**गोविंद लक्ष्मण तांगडे**
संशोधक विद्यार्थी
मो. क्र. ९६३७१११९८७
tangadegovind987@gmail.com

**प्रास्ताविक :**

क्रांतीज्योती सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव येथील ता. खंडाळा, जि. सातारा येथील खंडोबा सिदूजी नेवसे पाटील व लक्ष्मीबाई यांना कन्यारत्नाच्या रूपाने झाला. खंडोजी पाटील हे व्यवसायाने फुलमाळी व इनामदार घराणे होते. माई या त्यांचे पहिले अपत्य होत्या. माईंना सिंदूजी, सखाराम आणि श्रीपती हे तीन लहान भावंडे होती. सावित्रीचे सासरे गोविंदराव फुले हे मूळचे फुरसुंगीचे क्षीरसागर, परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येऊन राहिले. फुलांच्या व्यवसायावरून त्यांना फुले हे आडनाव मिळाले. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडेवाड्यात प्रथम शिक्षणाची मुहुर्तमेढ त्यांनी रोवली. त्यामध्ये अन्नपुर्णा जोशी, सुमती मोकाशी, दुर्गा भागवत, माधवी थत्ते, सोनू पवार, जनी कार्डिले या चार ब्राह्मण एक मराठा व एका धनगर जातीच्या मुलींना प्रवेश दिला.

सावित्रीबाईंनी १५ मे १८४८ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी प्रथम शाळा काढून १ मे १८४९ ला पुणे येथील उस्मान शेख वाड्यात पौढासाठी शाळा काढली. त्या शैक्षणिक प्रचार आणि प्रसार करतात, त्यांच्या या कृत्यामुळे सनातन्यांकडून माईंना नेहमीच अंगावर शेण दगड झेलून घाणेरड्या शिव्या ऐकाव्या लागत. म्हणून माई नेहमी सोबत दोन लुगडे ठेवत असत. इतका त्रास देऊनही माई आपल्या हातातील शैक्षणिक कार्य सोडत नाहीत, हे लक्षात आल्यावर सनातन्यांनी भाडोत्री मारेकरी पाठवले. मात्र त्यांचा परिणाम उलट झाला. त्याती धोंडिरम कुंभार हा तात्यासाहेबांच्या प्रेरणेने पंडित झाला त्याचे वेदाचार हे पुस्तक फार गाजले, तर रामोशी रोडे हा भक्षकच तात्याचा रक्षक झाला. अशाप्रकारे शुद्र अतिशुद्रांना शिक्षण देत असल्याच्या कारणाने तात्या साहेबांना व माईंना इ. स. १८४९ मध्ये गृहत्याग करावा लागला. तसेच १४ जानेवारी १८५२ मध्ये महिला सेवा मंडळातर्फे पहिला तिळगुळ समारंभ साजरा केला. तर १६ नोव्हेंबर १८५२ मध्ये मेजर कँडीच्या अध्यक्षतेखाली विश्रामबाग वाड्यात फुले दाम्पत्याचा इंग्रज अधिकाऱ्याकडून शैक्षणिक कार्यात उल्लेखणीय कार्य केल्याबद्दल गौरव केला. इ. स. १८४८ ते १८५२ या काळात पुणे, सातारा, नायगाव, नगर, ओतुर, सासवड, भिंगार, मुंढवे, शिरुर, शिरवळ, हडपसर, तळेगाव इत्यादी १८ ठिकाणी शाळा तर १ डिसेंबर १८५४ मध्ये अध्यापक शाळा काढली. तसेच इ. स. १८५४ मध्ये कामगारांच्या व शेतकऱ्यांसाठी रात्रशाळा काढली.

शिक्षिका, लेखिका, कवियित्री, माता, समाजसेविका अशा विविध भूमिकेतून सावित्रीबाईंनी समाजातील गोरगरीब, दुर्बल घटकांची सेवा करण्यात आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले. समाजातले स्त्रीदास्यत्व मिटविण्यासाठी स्त्रियांनी शिकून सवरून स्वावलंबी बनावे, म्हणजे त्यांना आपल्या खऱ्या शक्तीची ओळख होऊन प्ररूषप्रधान समाजाची गुलामगिरी पत्कारण्याची वेळ येणार नाही, असे ठाम मत सावीत्रीबाई फुले यांचे होते. पुरोगामित्वाचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात आजवर अनेक महापुरूषांनी योगदान दिले आहे. स्त्री शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयात क्रांतीज्याती सावित्रीबाई फुले यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आचरणात आणलेली स्त्री उध्दारासाठच्ी मुल्ये भावी पिढीसाठी अत्यंत महत्वपूर्ण आहेत. सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील योगदान, त्यांचे कार्य, समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि त्यांनी रूजविलेले शैक्षणिक मुल्ये पुढील पिढीकडे संक्रमित करण्यासाठी त्यांच्या विचारांची आणि आचारांची आज गरज आहे.

**संशोधन विषयाची निवड :**

अज्ञानाच्या अंधारात गुरफटलेल्या समाजाला सुशिक्षित करण्याचा विडा उचलत समाजाला ज्ञानी बनवण्यासाठी पुढे सरसावत स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या होत. १८४८ आणि १८५१ मध्ये सुरू झालेल्या शाळा म्हणजे एक अभूतपूर्व क्रांतीच. लखलखते तारे पाहण्यासाठी अंधाराचा सामना करावाच लागतो. अंधाराला घाबरणे सोपे आणि दिवा लावणे अवघड असते. परंतु कोणी तरी अवघड काम हाती घेणे आवश्यक असते. माळरानात सुंदर झाले लावून त्याचे नंदनवन करणे, हा जसा माझा धर्म आहे तसाच अज्ञानाने रेताड झालेल्या समाजात ज्ञानवृक्ष लावणे माझा मनुप्रणीत धर्म आहे, असे वाघिणीसारखे कडाडून सांगत शिक्षणकार्यात अडथळा आणू पाहणाऱ्यांना चपराख देणारे, ज्ञानदानाचे दीपस्तंभ सावित्रीबाईंनी निर्माण केले. शिक्षणातून जीवनातील खरे-खोटे निवडण्याची क्षमता आली पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. स्वत:चे विचार निर्भिडपणे मांडता येणारे शैक्षणिक क्रांती घडवू शकतात. मनुष्यात असलेले चांगले वाईट गुण आईच्या दुधातूतन तिच्या सहवासातून, शिक्षणातून व घरच्या संस्कारातून येतात. मुलांना घरातील सांस्कृतिक परिस्थितीचा लाभ मिळतो. तो लाभ मागासांच्या मुला मुलींना जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत त्यांच्या बुद्धीला मोठी झेप घेता येणार नाही, हा सावित्रबींचा सिध्दांत शिक्षणशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचा आहे, हे आज देखील आपण सर्वत्र पाहतो आहोत. हा सिध्दांत लक्षात घेऊनच त्यांनी १८४८ मध्ये पुण्यात आलेल्या हंटर कमिशनपुढे सर्व जातीधर्माच्या १२ वर्षाखालील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याचा आग्रह धरला.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. काही क्रुर रुढींनाही त्यांनी आळा घातला. बाल जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा- तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून करुप बनविले जात असे. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भृणहत्या करीत.

**शिका शिका रे, विद्या शिका**
**मनुचे काही ऐकू नका, कोणी मागे राहू नका**
**विद्या शिकूया, ज्ञान घेऊया, एक होऊया**

या उक्तीप्रमाणे अस्पृश्य लोकांना शिक्षण देवून त्यांची आर्थिक व नैतिक उन्नती साधण्यासाठी ज्ञानी लोकांनी कधीच प्रयत्न केला नाही. म्हणूनच सावित्रीबाईंनी मागास वस्तीत जाऊन त्यांना उपदेश करीत व मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आग्रह करीत शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शुद्रातीशुद्रांचे शिक्षण, अंधश्रध्दा, निर्मूलन या ध्येयपूर्तीने झपाटलेल्या सावित्रीबाइंची विचारशक्ती व प्रतिभा प्रगल्भ होती. शिक्षणामुळेच पशुत्व हटते आणि मनुष्यत्व येते. शिक्षण हे समाज परिवर्तनासाठी आहे, असे सिध्दांत मांडत विनामोबदला आणि शास्त्रशुध्द शिकवण्याचे काम करणाऱ्या सावित्रीबाई सर्वार्थाने शिक्षणतज्ज्ञ होत्या. त्यांचे प्राथमिक शिक्षणातील योगदान म्हणजे हिंदु संस्कृतीच्या इतिहासातील नव्या युगाचा आरंभ होय.

सावित्रीबाई फुले एक प्रतिभावंत शिक्षणतज्ज्ञ आणि नामवंत कवयित्री होत्या. त्यांच्याठायी कुशल नेतृत्वाचे अनेक गुण होते. त्या उत्तम संघटक होत्या. प्रभावी वक्त्या होत्या. सावित्रीबाईंच्या कार्याच्या, विचारांच्या परिणामातून लाभार्थी ठरलेल्या, अधिक शिकलेल्या स्त्रियांना सावित्रीबाई संबंधीची साधी जाणीव ही नाही, याचा अनुभव येतो. 'शिक्षणाने मनुष्यत्व' ही निष्ठा ठेवून सावित्रीबाईंनी कार्य केले आणि इथे त्याचा मागमूसही नाही. फुले दांपत्याने शाळा काढल्या, परंतु शाळांची जाळी विणीत ते बसले नाहीत. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यावयाचे नव्हते, शिक्षणातून त्यांना समाज जागृती करावयाची होती. जुनाट रूढी, अंधश्रध्दा, जुन्या परंपरा, भोळया समजुती नाहीशा करावयाच्या होत्या. समान्य लोक पशुतुल्य जीवन जगत होते, त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल याचा सावित्रीबाईंनी विचार केला होता. आपल्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात त्या म्हणतात-

***''शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा,
शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा''***

मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मूलभूत विचार सव्वाशे वर्षापूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या भारतातील थोर शिक्षणतज्ज्ञ होत. लोकांना माणूस बनविणे, ताठ मानेने उभे राहायला लोकांना शिकविणे, स्वत्व जपण्यास शिकविणे आणि त्याहीपलीकडे माणसांबःल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे एवढा शिक्षण विषयक व्यापक दृष्टीकोण ह्या लोकोत्तर स्त्रिच्या ठिकाणी होता.

आज समाजात समाजात सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचारांची पेरण करणे काळाची गरज आहे. सावित्रीबाई फुले यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा शैक्षणिक प्रभाव आज शैक्षणिक व्यवस्थेवर पडलेला आहे, परंतु त्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबाजावणी करून शैक्षणिक उपयोजन होणे आज काळाची गरज आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये:**

१) सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य स्पष्ट करणे.
२) सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचारांची आधुनिक प्रासंगिकता स्पष्ट करणे.
३) आधुनिक शिक्षण व्यवस्था आणि यामध्ये असणारे दोष व परिपूर्णता स्पष्ट करणे.
४) सावित्रीबाई फुले यांच्या काव्यातून प्रतिबिंबित झालेल्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.
५) सावित्रीबाई फुले व्यक्तिमत्व आणि मनुष्यत्वासाठी शिक्षण या संकल्पना स्पष्ट करणे.
६) तत्कालीन ब्राह्मण सुधारकांची अगतिकता स्पष्ट करणे.
७) आधुनिक स्त्रियांच्या समस्या आणि प्रश्न स्पष्ट करणे.

**महात्मा फुलेंनी सांगितलेली शेतीच्या विकासाचे उपाय :**

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचीच कारणे सांगितली नाहीत, तर त्यावर त्यांनी प्रभावी उपाय देखील सुचीत केलेले आहेत. शेतकऱ्यांच्या विदारक अवस्थेकडे पाहत त्यांनी म्हटले की, शेतकऱ्यांना बंदुका द्याव्यात. शेतीचे आधुनिकीकरण करावे, वृक्षतोड थांबवावी, पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता नव्या उपकरणांचा वापर करावा, धरणे व कालवे बांधावी, दुष्काळात कर्ज द्यावे, शेतीसाठी आवश्यक पाणी देण्याची व्यवस्था सरकारने करावी आणि शेतकऱ्यांना शेतीसाठी जास्तीत जास्त वेळ देता यावा म्हणून शेतीला पाणी नळाद्वारे देण्यात यावे इतकेच नव्हे तर रान डूकरे आणि वन्य प्राण्यापासून शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना गावठी बंदुका देण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांची आजची परिस्थिती पाहता ते किती द्रष्टे आणि प्रगल्भ विचारधारेचे होते, याचा अंदाज आपणास येतो. महात्मा फुलेंनी तत्कालीन काळात सांगितलेली परिस्थिती आजही जशीच्या तशी आहे.

वन्यप्राण्यांपासून पिकांचे रक्षण करावे यासाठी महात्मा फुले 'शेतकऱ्यांचा आसूड' यामध्ये लिहितात, 'आमच्या सरकारी जंगलातील रानटी जनावरांपासून शूद्र शेतकऱ्यांच्या शेतांचा बच्याव करण्यापुरत्या गावठी तोड्याच्या का होईनात, जुन्या डामीस बंदुका शूद्र शेतकऱ्यांजवळ ठेवू देण्याची परवानगी द्यावी.' अशाप्रकारची मागणी त्यांनी ब्रिटीश सरकारकडे केली होती. तसेच शेतकऱ्यांच्या शेतांचे रानडुकरे वगैरे जनावरांनी खाऊन नुकसान केल्यास ते सर्व नुकसान पोलिस खात्याकडील वरिष्ठ अंमलदारांच्या पगारातून किंवा सरकारी खजिन्यातून शेतकऱ्यांच्या पगारातून किंवा सरकारी खजिन्यातून शेतकऱ्यांस भरून देण्या विषयी कायदा करावा अशी मागणी हि केली होती. 'असे केल्यास शेतकऱ्यांस रात्री पोटभर झोपां मिळून त्यास दिवसा आपल्या शेतीत भरपूर उद्योग करण्याची सवड मिळणार नाही' असे त्यांचे मत होते.

**शेतकऱ्यांची आत्महत्या**

याबाबतही त्यांचे विचार आजही किती समर्पक आहेत हे फुल्यांच्या विचारांतून स्पष्ट होते. त्यावेळी विष घेऊन (कान्हेरीच्या मुळया वाटून प्याल्यास) आत्महत्येचा विचार शेतकरी करीत होता. आज मात्र तो प्रत्यक्ष आत्महत्या करतो आहे, इतकाच बदल परिस्थितीत झाला आहे, बाकी समस्या, अडचणी त्याच आहेत. यावरून महात्मा फुलेंच्या विचारांची आणि प्रगल्भतेची जाणीव आपणास होते.

**कौशल्य विकास**

आज कौशल्य विकासाच्या बाबतीत मोठेपणाच्या, दिखाव्याच्या गोष्टी होत असतांना आपणास दिसून येतात. परंतु महात्मा फुलेंनी हा विचार सव्वाशे वर्षापूर्वी मांडला होता. ज्ञानावर आधारित शिक्षणाबरोबरच कौशल्य पूर्ण मुल्याशिष्टीत शिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले होते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या शाळेत शेती व औद्यागिक शिक्षण सक्तीचे केले होते. अशाप्रकारे महात्मा फुले यांचे शिक्षण, समाजसुधारणा यासोबतच शेती विषयक विचार आजही प्रासंगिक आहेत. शेतकरी हा संपूर्ण समाजव्यवस्थेचा कणा आहे. परंतु तोच अज्ञान अंधश्रध्देच्या भारांनी वाकला आहे. त्यांच्या ताठपणावरच समग्र समाजाचे जीवन अवलंबून आहे. त्यामुळे त्याच्यातील अज्ञानाची पुटे जितक्या लवकर दूर होतील तितकी समाजसुधारणेस गती प्राप्त होईल. त्यासाठी शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे. शेतकऱ्यांची पिछेहाट, अवनती ही अज्ञानामुळेच झाली आहे. जोपर्यंत शेतकरी बौद्धिकदृष्ट्या संपन्न होत नाही तोवर परावलंबत्व, लाचारी, अगतिकता, असहायता त्याची पाठ सोडत नाही. पडलेल्या प्रश्नांना निर्भडपणे, सडेतोड उत्तर देण्याची ताकद शिक्षणातच असत. त्यामुळेच त्यांनी सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह धरला होता. त्यातच त्यांना समाजाच्या सर्वांगिन प्रगतीचा मार्ग सापडला.

भारतातील कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज हा शेतीवर आपली गुजराण करतो. शेतीमधील काबाडकष्टाची कामे करूनही पदरी काहीच पडत नाही, ही शेतकऱ्याची वास्तविक परिस्थिती होती. 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये फुल्यांनी शेतकऱ्याच्या हलाखीची अनेक कारणे सांगितली आहेत. आळसावलेल्या बैलावर आसूडाचे प्रहार केल्याशिवाय बैल वठणीवर येत नाही. त्याचप्रमाणे शूद्रांच शोषण करणारांवर आसूडाचे प्रहार झाले पाहिजेत अशी फुल्यांची भूमिका होती.

शेतीविषयी जोतिबा फुले यांनी दिलेला संदेश आजही आपणास उपयोगी आहे. शेती आणि शेतकरी हा त्यांचा जीवनातील लिखाणाचा अविभाज्य घटक आहे. त्यांनी त्यावेळी 'पाणी अडवा - पाणी जिरवा' ही संकल्पना सांगितली होती ती आज ही आपणास उपयोगी पडत आहे. शेतकऱ्याच्या अडचणी, त्यांचा होणारा अनावश्यक खर्च, कर्ज, काढून केलेली लग्न कार्य त्यामुळे होणारा त्रास ह्या सर्व गोष्टी आजही आपणास दिसून येतात. यातून महात्मा फुलेंची प्रगल्भता, स्वतंत्र विचारधारा अशा बहूआयामी व्यक्तीमत्त्वावर प्रकाश पडतो.

शेती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांचा विद्वान मुलांना पाठवून शेतीचा नवा अभ्यास करवून घ्यावा इत्यादी महात्मा फुलेंनी सुचविलेले हे उपाय पुस्तकी ज्ञानातून नव्हे तर अनुभवातून आलेले आहेत. त्यांच्याजवळ स्वतंत्र विचार करण्याची, स्वतंत्र अन्वयार्थ लावण्याची कुवत आणि प्रगल्भता असल्यामुळे नवे कोरे निष्कर्ष त्यांना काढता आले. त्यामुळेच त्यांच्या लेखनातून सतत एक जीवंत व दाहक अनुभव शब्दबध्द होतांना दिसून येतो. महात्मा ज्योतिबा फुलेंनी सुचविलेल्या या उपाययोजना मुलगामी होत्या त्या आजही प्रासंगिक आणि महत्त्वाच्या आहेत. जोतीराव हे कोणी नावाजलेले त्या प्रसंगी अर्थशास्त्रज्ञ नव्हते. तर ते कृतीशील समाजचिंतक होते. तेव्हा त्याच वेळेस आर्थिक शोषणाची चिकित्सा तत्कालीन कोणत्याही अर्थतज्ञाला करता आला नाही. शेती व शेतकरी यांचा समग्रपणे व सुसंगतपणे विचार करणारे फुले हे पहिले एकमेव सुधारक होते.

**ग्रंथसूची :**


१) महात्मा ज्योतिबा फुले - धनंजय किर
२) सावित्रीबाईची जोतिबास पत्रे, सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, संपा. डॉ. मा. गो. माळी, म. रा. सा. सं. मंडळ प्रका. आ. पहिली.
३) महात्मा फुले गौरवग्रंथ -सं. डॉ. मा. गो. माळी व इतर, म. रा. सा. सं. मंडळ, प्रका. जुलै ८२.
४) महात्मा जोतिराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, कीर, डॉ. धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पुनर्मुद्रण १९७५.
५) संशोधन पध्दतीशास्त्र - डॉ. रा. ग. बोरूडे
६) सामाजिक संशोधनाची तंत्रे - सोमन मा. श.
७) समाज शास्त्रीय संसाधन तत्व पध्दती - घाटोळे र. मा.
८) संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे - डॉ. आगलावे प्रदीप
९) सामाजिक मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या उपयुक्ततेचा अभ्यास - साठे एस.